MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
CIN No.U40109MH2005SGC153646

# महापारेषण समाचार

वर्ष : १५ अंक : १ पाने : ८ ■ डिसेंबर २०२०-जानेवारी २०२१ ■ E-Magazine visit us on : www.mahatransco.in

**प्रिय कर्मचारी बंधू आणि भगिनींनो,**

आपल्या सर्वांना नववर्षाच्या शुभेच्छा! गतवर्षी आपण सर्वांनी कोरोनासारख्या महामारीचा सामना करत आपली पारेषण यंत्रणा अविरत सुरू ठेवण्यास मोलाचा हातभार लावला. हे गतवर्ष आपल्याला अनेक धडे शिकवून गेले. आपल्या सर्वांच्या जिद्द व चिकाटीमुळे आपण या कठीण परिस्थितीत सुध्दा चांगली कामगिरी केली. त्याबद्दल व्यवस्थापनातर्फे मी आपल्या सर्वांचे कौतुक करतो. डिजिटल माध्यमाचा खूप चांगला उपयोग गतवर्षात आपल्याला समजला. आपल्या बैठका, सभा, चर्चासत्रे, माहितीचे आदान-प्रदान यासाठी अनेक ऑनलाईन माध्यमे जी आपण फार कमी प्रमाणात वापरत होतो, ती आपण

- **लॉकडाऊनच्या काळात चांगली कामगिरी**
- **चाकणचा सोलर प्रकल्प पथदर्शी**
- **सांघिक कामगिरीवर भर द्या**
- **लक्ष्ये (Targets) पूर्ण करा**

या लॉकडाऊनच्या काळात अतिशय व्यापक स्वरूपात उपयोगात आणली.

आपली कंपनी अत्यावश्यक सेवेत (Emergency Services) असल्यामुळे संपूर्ण लॉकडाऊनच्या काळात अभियंते, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पूर्ण क्षमतेने आपले कर्तव्य बजावले. महामारीमुळे आपले काही अधिकारी व कर्मचारी आजारग्रस्त झाले. काहींना प्राणही गमवावा लागला. तरीही अशा कठीण परिस्थितीत कोणीही बाऊ न करता आपले कर्तव्य बजावत राहिले. त्याबद्दल व्यवस्थापनाला त्याचा सार्थ अभिमान आहे.

नववर्षात फार मोठ्या प्रमाणात महामारीबद्दल असणारी भीती आता हळूहळू कमी होत आहे. त्याचबरोबर शासनाने घातलेली निर्बंधे शिथील करण्यात येत आहेत. त्यामुळे जनजीवन हळूहळू पूर्वपदावर येण्यास अनुकुल परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे विजेच्या मागणीतही वाढ झाली आहे. नववर्षात हीच विजेची मागणी कोरोना पूर्वनोंदीच्या पुढे जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. या नववर्षात आपल्याला पारेषण प्रणालीच्या सक्षमीकरणासाठी तसेच त्याच्या वाढीसाठी केलेल्या सर्व नियोजनाचे कार्य अतिशय चोखपणे पार पाडणे गरजेचे आहे. प्रकल्प, संचलन व सुव्यवस्था हे पारेषण यंत्रणेचे दोन महत्त्वाचे घटक आहेत. या दोन्ही विभागाची कार्यक्षेत्रे विशाल आहेत. प्रकल्प नियोजित वेळेत पूर्ण झाल्यास त्याचा आमुलाग्र फायदा कंपनीस होत असतो. त्याचप्रमाणे संचलन व सुव्यवस्था यामध्ये ठरवून दिलेले कार्यनियोजन त्या वेळेनुसार काटकोर पध्दतीने पार पाडले असता, आपली पारेषण यंत्रणा अखंडित ठेवण्यास मोलाची मदत मिळते.

या कालावधीत व्यवस्थापनाकडून सांघिक कार्यालयातील अनेक विभागांबरोबर आढावा बैठका घेण्यात आल्या. तसेच प्रत्येक विभागास त्यांच्याअंतर्गत सुधारणेकरिता सूचना करण्यात आल्या. त्याचबरोबर क्षेत्रीय कार्यालयांची सुध्दा आढावा बैठक घेण्यात आली. त्यामध्ये सुरूवातीला नाशिक परिमंडळ व पुणे परिमंडळाची आढावा बैठक घेण्यात आली. बैठकीअंती अनेक बाबींवर पुढची दिशा ठरविण्यात आली. तसेच अंतर्गत सुधारणेकरिता योग्य त्या सूचना देण्यात आल्या. नाशिक परिमंडळाने नवीनच उभारणी केलेल्या प्रकाशकिरण या पारेषण विश्रामगृहाचे उद्‌घाटन करण्यात आले. त्यांनी निर्माण केलेल्या या वास्तुमुळे अनेकांना त्याचा लाभ घेता येईल. या कार्यात सहभागी झालेल्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मी व्यवस्थापनातर्फे कौतुक करतो. तसेच पुणे परिमंडळातील ४०० के. व्ही. चाकण उपकेंद्रात सोलर विद्युतीकरणाचा अभिनव प्रयोग करण्यात आला आहे. यामुळे अपारंपारिक ऊर्जा (सोलर) आपल्याला उपलब्ध करून ४०० के. व्ही. चाकण उपकेंद्राकरिता लागणाऱ्या पारंपारिक ऊर्जेची फार मोठ्या प्रमाणावर बचत होणार आहे. हा प्रयोग पथदर्शी असून भविष्यात अनेक उपकेंद्रात राबविण्याचा विचार आहे. अशा प्रयोगामुळे या उपकेंद्राकरिता अंतर्गत विजेची गरज फार मोठ्या प्रमाणावर कमी होण्यास मदत होते. हा प्रकल्प नियोजित व कार्यान्वित करणाऱ्या सर्व अभियंते व कर्मचारी यांचे मी मनापासून अभिनंदन करतो.

व्यवस्थापनाची अपेक्षा असते की, असे अनेक Value Engineering, Value Addition चे प्रकल्प कंपनीत आपल्या अभियंते व कर्मचारी वर्गातून निर्माण झाले पाहिजेत. त्याकरिता अभियांत्रिकी विषयामध्ये जिज्ञासा व सचोटी ठेवणे गरजेचे आहे. अतिशय चांगल्या प्रकारचे सादरीकरण व त्याच्या आधारावर संशोधन आणि विकास करण्याचा प्रयत्न प्रत्येक अभियंते व कर्मचाऱ्यांनी केला पाहिजे. आपला भर Engineering Excellence वर देण्याचा प्रयत्न केला तर नक्कीच आपण सादरीकरण, संशोधन आणि विकास करू, असा मला विश्वास आहे. प्रत्येक अभियंते, कर्मचारी यांचा असा निर्धार असला पाहिजे की, Engineering Marvels (Case Study) किती जास्त आपण करू व त्याचा फायदा संपूर्ण



**दिनेश वाघमारे (भा.प्र.से.)**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

अभियांत्रिकी क्षेत्राला अविरत मिळत राहील. प्रत्येक लहान-मोठ्या Value Engineering, Value Addition Projects मुळे कंपनीत फार मोठ्या प्रमाणावर अंतर्गत सुधारणा होऊ शकतात. त्याचा आमुलाग्र फायदा कंपनीला पुढील अनेक वर्षे मिळू शकतो. विजक्षेत्र खूप मोठे विश्व आहे. आज व्यवस्थापनाची इच्छा आहे की, महापारेषण कंपनीचे नाव संपूर्ण विजक्षेत्रामध्ये माझे अभियंते व कर्मचारी करतील.

पुन्हा एकदा आपणा सर्वांना नवीन वर्षाच्या खूप-खूप शुभेच्छा! यावर्षी सुध्दा आपण सर्वजण दक्ष राहून आपल्या पारेषण प्रणालीची सर्वतोपरी निगा राखाल, याची मला खात्री आहे. कोरोना महामारीची भिती जरी कमी झाली असली तरी, संकट अजून पूर्णतः टळले नाही. जोपर्यंत या महामारीचे संपूर्ण निर्मूलन होत नाही, तोपर्यंत शासनाने दिलेल्या सर्व नियमावलीचे तंतोतंत पालन करणे, ही आपली व आपल्या कुटुंबाची जबाबदारी आहे. `माझे कुटुंब, माझी जबाबदारी` या महाराष्ट्र शासनाच्या मोहिमेची आपण नेहमी आठवण ठेवली पाहिजे.

तसेच २०२०-२०२१ च्या शेवटच्या तिमाहीमध्ये सर्व ताकदीनिशी वर्ष २०२०-२०२१ करिता कंपनीने ठरवून दिलेली लक्ष्ये (Targets) पूर्ण करण्यासाठी सर्व विभागप्रमुखांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत. त्यांच्या या प्रयत्नाला यश मिळेल, अशी मला खात्री आहे.

**शुभेच्छांसह..!**

**- दिनेश वाघमारे**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक



पुणे : महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांचे स्वागत करताना पुणे परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. वंदनकुमार मेंढे. शेजारी महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. संजय ताकसांडे.

## ■ अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालकांनी घेतली पुणे परिमंडळाची आढावा बैठक ■

# प्रकल्पांची कामे वेळेत पूर्ण करण्याचे दिले निर्देश

■ *टीम महापारेषण, पुणे*

अति उच्च दाब प्रकल्प नि संचलन व सुव्यवस्था पुणे परिमंडळाचा आढावा महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला. यावेळी महापारेषणचे संचालक (प्रकल्प) श्री. रवींद्र चव्हाण, संचालक (संचलन) श्री. संजय ताकसांडे, कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे उपस्थित होते.

बैठकीच्या सुरूवातीला पुणे परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. वंदनकुमार मेंढे यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. तद्नंतर पुणे परिमंडळातील आतापर्यंत झालेल्या व भविष्यात होणाऱ्या विविध प्रकल्पांची आणि परिमंडळामधील विविध घटनांचा आढावा घेणारी चित्रफित सादर केली.

अउदा प्रकल्प मंडळ, पुणे यांच्या वतीने सद्यस्थितीत चालू असणाऱ्या प्रकल्पांविषयी येणाऱ्या अडचणीबाबत व संभाव्य प्रकल्प पूर्ण करण्याचे लक्ष्य (Target) बद्दल अधीक्षक अभियंता श्रीमती चारूता बेंद्रे यांनी सादरीकरण केले. यामध्ये प्रामुख्याने १३२ के. व्ही. रास्ता पेठ, उपकेंद्र ते २२० के. व्ही. मगरपट्टा उपकेंद्र दरम्यान टाकत असलेल्या भूमिगत केबल, ४०० के. व्ही. लोणीकंद उपकेंद्र-२ येथील १३२ के. व्ही. लेव्हल, ४०० के. व्ही. तळेगाव (Power Grid) ते ४०० के. व्ही. तळेगाव (PG) ते ४०० के. व्ही. लोणीकंद उपकेंद्र या दरम्यान वाहिन्यांची उंची वाढविणे, १३२ के. व्ही. कुर्डुवाडी उपकेंद्र वाहिनी कार्यान्वित करणे आणि पुणे मेट्रोकरिता गणेशखिंड-चिंचवड व रहाटणी-वरसगाव वाहिनीची उंची वाढविणे आदी कामांची माहिती देण्यात आली. या सर्व प्रकल्पांच्या चालू असणाऱ्या कामाच्या प्रगतीबाबत अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांनी समाधान व्यक्त केले. तसेच उर्वरित कामेही लवकर पूर्ण करण्याचे निर्देश दिले. दरम्यान, महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. संजय ताकसांडे, संचालक (प्रकल्प) श्री. रवींद्र चव्हाण यांनी पुणे मेट्रो प्रकल्प जलदगतीने पूर्णत्वास जाण्यासाठी महापारेषण कंपनीतर्फे लागणारे सर्वतोपरी सहकार्य करण्याचे निर्देश दिले. त्याचप्रमाणे ४०० के. व्ही. चे ग्रिड (Stringing) मजबूत करण्यासाठी व पुणे, पिंपरी चिंचवड व लगतच्या परिसरास लागणारा वीजपुरवठा अखंडितपणे चालू ठेवण्यासाठी व चालू असणारे प्रकल्प जलदगतीने पूर्ण करण्यासाठी संचालकांनी सूचना दिल्या. पुणे परिमंडळात मेट्रोसंदर्भात चालू असणाऱ्या सर्व कामांच्या देखरेखीवर स्वतः लक्ष घालून आणि संबंधित सर्व अधिकाऱ्यांसमवेत बैठका घेऊन कामाचे नियोजन करत असल्याचे मुख्य अभियंता श्री. वंदनकुमार मेंढे यांनी सांगितले. त्यानंतर अधीक्षक अभियंता श्रीमती ज्योती चिमटे अउदा संवसु मंडळ, पुणे/अउदा संवसु मंडळ, सोलापूर अधीक्षक अभियंता (प्रभारी) श्री. राम शेळके चाचणी व संचारण मंडळ, पुणेचे अधीक्षक अभियंता श्री. जयंत कुलकर्णी यांच्या वतीने चालू असणाऱ्या सर्व घडामोडीचे सादरीकरण करण्यात आले. या सादरीकरण दरम्यान, थेऊर उपकेंद्र के लोणीकंद उपकेंद्र, थेऊर उपकेंद्र ते १३२ के. व्ही. खराडी उपकेंद्र आणि २२० के. व्ही. थेऊर उपकेंद्र ते १३२ के. व्ही. चाक उपकेंद्र दरम्यान चालू असणाऱ्या Existing Conductor Replacement by HTLS Conductor च्या कामाबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. याबाबत बोलताना अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे म्हणाले की, ``कोणत्याही प्रकारचा प्रकल्प राबविताना त्याबाबतचे फायदे लोकांमध्ये पोहोचविण्यासाठी सोशल मीडिया, वृत्तपत्रे आदींचा वापर प्रभावीपणे केला पाहिजे. जेणेकरून ROW Problem सुध्दा कमी होतील. तसेच सध्या चालू असणाऱ्या वाहिन्यांमुळे सामान्य जनतेला व जनावरांना त्रासदायक होऊ शकणाऱ्या घटनांबाबत संबंधित परिसरात आवश्यक ती जागृती निर्माण होऊन नियोजित काम वेळेत पूर्ण होण्यास मदत होईल.''

अधीक्षक अभियंता, चाचणी व संचारण मंडळ, पुणे श्री. जयंत कुलकर्णी यांनी पुणे परिमंडळात चालू असणाऱ्या LTS Scheme, Substation Protection Audit आदीबाबत सविस्तर माहिती दिली. तसेच अधीक्षक अभियंता, अउदा संवसु मंडळ, पुणे व सोलापूर यांनी Critical Substation, Unutilized/unloaded substation, R&M Budget, Lines आदीबाबत सविस्तर सादरीकरण केले. अउदा प्रकल्प नि संवसु परिमंडळ, पुणे येथील उपलब्ध मनुष्यबळाचा कार्यक्षमपणे वापर करून घेण्याबाबतच्या सूचना कार्यकारी संचालक (मा. सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे यांनी यावेळी दिल्या.








पुणे : चाकण ४०० के. व्ही. उपकेंद्रात स्मार्ट सोलर पॉवर निर्मिती पथदर्शी प्रकल्पाची पाहणी करताना महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे. शेजारी संचालक (संचलन) श्री. संजय ताकसांडे, कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे, मुख्य अभियंता श्री. वंदनकुमार मेंढे, अधीक्षक अभियंता श्रीमती ज्योती चिमटे, श्रीमती चारूता बेंद्रे, श्री. जयंत कुलकर्णी, श्री. अनिल पाटील.

■ *प्रदूषणविरहित पर्यावरणपूरक वीजनिर्मिती होणार* ■

# चाकणमध्ये स्मार्ट सोलर पॉवर निर्मिती पथदर्शी प्रकल्प

■ **टीम महापारेषण, पुणे**

*चाकण ४०० के. व्ही. उपकेंद्रातील स्मार्ट सोलर पॉवर निर्मिती पथदर्शी प्रकल्प महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांच्या हस्ते कार्यान्वित करण्यात आला.*

*यावेळी संचालक (संचलन) श्री. संजय ताकसांडे, कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे, पुणे परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. वंदनकुमार मेंढे, अधीक्षक अभियंता श्रीमती ज्योती चिमटे, श्रीमती चारूता बेंद्रे, श्री. जयंत कुलकर्णी, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा. सं.) श्री. प्रशांत चौधरी, कार्यकारी अभियंता ४०० के. व्ही. चाकण श्री. अनिल पाटील यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.*

*सदर प्रकल्प हा नेट मिटरिंग व हायब्रीट सिस्टीम पारेषणरहित कार्यान्वित करण्यात आला आहे. हा ट्रान्समिशन इनटिटीमधील पहिला पथदर्शी प्रकल्प आहे. हा पूर्णतः पर्यावरणपूरक प्रकल्प आहे. कार्बन विसर्जन वर्षाकाठी ९७ हजार किलो वायू कमी होतो. या प्रकल्पामुळे १२ ते १५ लाखांची वर्षाकाठी बचत करता येईल.*

*सदर प्रकल्प हा भविष्यात जे दोन सोर्स सबस्टेशन कोडनुसार गरजेचे असतात. ते सोलर पॉवरच्या माध्यमातून उपलब्ध झाल्यास वर्षामध्ये मोठ्या प्रमाणात बचत होऊ शकते. दररोजच्या वापरातील वीजबचत होऊ शकते.*

## प्रकल्पाची वैशिष्ट्ये

- **पर्यावरणपूरक प्रकल्प**
- **ट्रान्समिशन इनटिटीमधील पहिला प्रकल्प**
- **वर्षाला १२ ते १५ लाखांची बचत**
- **वीजबचतही होणार**
- **गुणवत्तापूर्ण उपकरणे**
- **अखंड विजेचा पुरवठा होणार**

*तसेच अपारंपरिक ऊर्जास्त्रोत ही कायमस्वरूपी उपलब्ध असल्याने प्रदूषणविरहित वीजनिर्मितीचा उद्देशही साध्य होऊ शकतो.*

*चाकण ४०० के. व्ही. उपकेंद्रामध्ये गेली पाच वर्षे अभ्यास केला असता सर्वसाधारण प्रत्येक दिवशी वीजवापर सरासरी १३०० युनिट (केडब्ल्यूएच) होत होता. यासाठी प्रत्येक महिन्याला सुमारे पाच लाखांचा खर्च येत होता. चाकण येथे अभ्यास करून जुन्या पध्दतीचा लाईट या एलईडी लाईट विथ रियल टाईम कंट्रोलर प्रणालीमध्ये बसविली. तसेच वातानुकूलित यंत्रणामध्ये महत्त्वाचा घटक कॉम्प्रेसरमध्ये बदल तापमान हे २३ डिग्री सेल्सियससला ठेवले. हा उपक्रम राबविल्यानंतर वीजबचत ३०० युनिट प्रति दिवस झाली. वीजवापर हा १३०० युनिट प्रति दिवस वरून साधारणतः १००० ते ११०० युनिट प्रति दिवस झाला. हे करत असताना सोलर पॉवर प्रकल्पावर अहवाल बनविला. त्याची प्रशासकीय मान्यता घेऊन महावितरण व मेडाकडून फिजिबिलीटी रिपोर्ट व प्रकल्प मान्यता घेऊन त्यांनी सुचविलेले बदल आपल्याकडे आवश्यकता लक्षात घेऊन केले. दरम्यान, या प्रकल्पासाठी लागणारी उपकरणे मागविण्यात आली.*

*सदर प्रकल्प अहवालानुसार परतावा कालावधी हा सर्वसाधारण चार ते पाच वर्षे गृहित धरण्यात आला होता. परंतु, गुणवत्तापूर्ण सोलर पॅनल इनव्हर्टर जर्मनी, स्वीडन येथून आयात केलेले वापरले. तसेच सौरऊर्जा पॅनल हे ए++ क्वालिटी व उपयोगात येणाऱ्या केबल व स्वीचेस चांगल्या उत्पादकांकडून निवडल्या. त्यामुळे सर्वसाधारण ४५० ते ५०० युनिट प्रति दिवस वीजनिर्मिती होत आहे. या प्रकल्पातून होणारी वीजनिर्मिती साधारण ३ वर्षे ६ महिने हा कालावधी परतावा मिळण्यास निर्माण होत आहे.*

*या प्रकल्पात नेट मिटरिंग प्लस हायब्रीट सिस्टीम असल्याने स्काडा रिबुट पिरियड जो साधारण ३० मिनिटे होता, तो आता पूर्णपणे बंद झाला आहे. निरंतर २४x७ ऊर्जास्त्रोत उपलब्ध झाल्यामुळे फिडर डाऊन टाईमही कमी झाला आहे. भविष्यात हा प्रकल्प अन्य उपकेंद्रातही राबविण्याचा विचार असल्याचे महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांनी यावेळी सांगितले. तसेच ४०० के. व्ही. चाकण येथील कार्यकारी अभियंता श्री. अनिल पाटील व उपकार्यकारी अभियंता श्री. श्रीकांत पुजारी, श्री. भागवत बोरूळे यांचे अभिनंदन केले.*

**NO MASK NO ENTRY**

My Family
My Responsibility



**नाशिक :** येथील महापारेषणच्या प्रकाशकिरण या विश्रामगृह इमारतीचे उद्‌घाटन महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी सर्वश्री संचालक (संचलन) संजय ताकसांडे, संचालक (प्रकल्प) रवींद्र चव्हाण, मुख्य अभियंता राजेंद्र गायकवाड, प्रवीण भालेराव, संदीप हाके, माणिक गुट्टे, विलास खाचणे.

## ■ महापारेषणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती ■

# प्रकाशकिरण विश्रामगृहाचे थाटात उद्‌घाटन

■ *टीम महापारेषण, नाशिक*

येथील महापारेषणच्या प्रकाशकिरण या विश्रामगृह इमारतीचे उद्‌घाटन महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी संचालक (संचलन) श्री. संजय ताकसांडे, संचालक (प्रकल्प) श्री. रवींद्र चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.

कोविड-१९ सुरक्षेच्या सर्व नियमावलीचे पालन करून मुख्य प्रवेशव्दारावर महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांनी फित कापून उद्‌घाटन केले. याप्रसंगी नाशिक परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. राजेंद्र गायकवाड, अधीक्षक अभियंता श्री. प्रवीण भालेराव, श्री. संदीप हाके, श्री. माणिक गुट्टे, श्री. विलास खाचणे उपस्थित होते.

उद्‌घाटनानंतर महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे, संचालक (प्रकल्प) श्री. रवींद्र चव्हाण व संचालक (संचलन) श्री. संजय ताकसांडे यांनी विश्रामगृहाची पाहणी करून समाधान व्यक्त केले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अधीक्षक अभियंता (स्थापत्य) श्री. संदीप हाके, कार्यकारी अभियंता श्री. विनोद ढोरे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. समीर साळवे यांनी विशेष परिश्रम घेतले. तद्नंतर महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांनी प्रशासकीय इमारतीतील कॉन्फरन्स हॉलमध्ये नाशिक परिमंडळाची आढावा बैठक घेतली.

---

**माझी वसुंधरा # ईप्लेज**

## ■ पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभागाचा पुढाकार ■

# नागपुरात महापारेषणच्या अधिकाऱ्यांनी घेतली हरितशपथ

■ *टीम महापारेषण, नागपूर*

अति उच्च दाब प्रकल्प नि संवसु परिमंडळ, नागपूर येथे महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभागाच्या मोहिमेंतर्गत 'माझी वसुंधरा अभियान' दि. १ ते १५ जानेवारी या कालावधीत घेण्यात आले. यावेळी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी हरितशपथ घेतली.

सुरूवातीला कार्यक्रमाची प्रस्तावना सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. अभय रोही यांनी केली. प्रस्तावनेत त्यांनी पृथ्वी, वायू, जल, अग्नी आणि आकाश या निसर्गाशी संबंधित पंचतत्वासोबत जीवनपध्दती अंगीकारल्याशिवाय आपण निसर्गासोबत जगू शकणार नाही. तसेच जैवविविधतेचेही अस्तित्व राहणार नाही, याचे महत्त्व लॉकडाऊनच्या काळात वातावरणात झालेल्या बदलाचे उदाहरण देऊन स्पष्ट केले. तसेच प्रत्येकांनी हरितशपथ घेऊन त्याची अंमलबजावणी करण्याचे आवाहन केले. दरम्यान, यावेळी नागपूर परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. महेंद्र वाळके यांनी हरितशपथ घेण्याचे महत्त्व पटवून दिले. पर्यावरणाविषयी जागरूकता प्रत्येकांनी दाखवावी. तसेच पुष्पगुच्छ भेट म्हणून देण्यापेक्षा तुळशीचे रोप द्यावे किंवा वृक्षारोपण करून निसर्गाचा समतोल राखण्यास मदत होईल, असे उपक्रम करण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमास सहाय्यक महाव्यवस्थापक (विवले) श्री. पीयूष चिक्षे, कार्यकारी अभियंता (प्रशासन) श्रीमती प्रणोती बुंदाले, सहाय्यक मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी श्री. पी. बी. परचाके आणि इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. शासनाच्या या मोहिमेस नागपूर परिमंडळांतर्गत येणारे सर्व प्रविभाग व विभागीय कार्यालयांनी त्यांच्या कार्यालयात शपथ घेऊन सदर अभियानास चांगला प्रतिसाद दिला.



**नागपूर :** अउदा प्रकल्प नि संवसु परिमंडळात महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभागाच्या मोहिमेंतर्गत माझी वसुंधरा अभियानात अधिकारी व कर्मचाऱ्यांनी हरितशपथ घेतली. याप्रसंगी मुख्य अभियंता श्री. महेंद्र वाळके, श्री. अभय रोही, श्री. पीयूष चिक्षे, श्रीमती प्रणोती बुंदाले, श्री. पी. बी. परचाके व अन्य.

## Welcome



**मुंबई :** महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांच्या एचएसबीसी इमारतीमधील नूतनीकरण केलेल्या दालनानिमित्त प्रधान सचिव (ऊर्जा) श्री. असीमकुमार गुप्ता यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

## सुस्वागतम्



**पुणे :** महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांचे स्वागत करताना पुणे परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. वंदनकुमार मेंढे

## हृद्य स्वागत



**मुंबई :** महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांच्या एचएसबीसी इमारतीमधील नूतनीकरण केलेल्या दालनानिमित्त महापारेषणचे संचालक (प्रकल्प) श्री. रवींद्र चव्हाण, संचालक (संचलन) श्री. संजय ताकसांडे, संचालक (वित्त) श्री. अशोक फळणीकर, कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे, कार्यकारी संचालक (SLDC) श्री. श्रीकांत जलतारे, कंपनी सचिव विनीता श्रीवाणी यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

## स्वराज्यजननी



**कराड (सातारा) :** येथे राजमाता जिजाऊ यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी मुख्य अभियंता श्री. अनिल कोलप, अधीक्षक अभियंता श्रीमती शिल्पा कुंभार, श्रीमती छाया साळे, श्री. सुनील माने, श्री. अशोक सागरे, श्री. चिदाप्पा कोळी, श्री. अतुल मणूरकर व अन्य कर्मचारी.

## जय संविधान, जय भारत



**कराड (सातारा) :** अउदा प्रकल्प नि संवसु परिमंडळ येथे ७२ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी भारताचे संविधान प्रस्तावना प्रतिमेचे अनावरण मुख्य अभियंता श्री. अनिल कोलप यांनी केले. यावेळी अधीक्षक अभियंता श्रीमती शिल्पा कुंभार, श्रीमती छाया साळे, श्री. किशोर पाटील, श्रीमती सुनिता कुलकर्णी, श्री. पद्माकर जोशी आदी.

## नोंदणीकृत स्पोर्टस् क्लबची स्थापना



**नागपूर :** येथे प्रजासत्ताकदिनी महापारेषण क्रीडा व सांस्कृतिक मंडळाची स्थापना करण्यात आली. याप्रसंगी मुख्य अभियंता सर्वश्री महेंद्र वाळके, अधीक्षक अभियंता सतीश अणे, अविनाश कसबेकर, अविनाश निंबाळकर, संजय आत्राम, पीयूष चिक्षे, अभय रोही, जयवंत कोकाटे, मुकेश तट्टे, विशाल मेश्राम, रवींद्र रामटेके, राजेंद्र पालथे, प्रवीण पिल्लेवान, प्रांजय पाटील, राहुल बारापात्रे, सागर सोनुले, संजय भड.

प्रजासत्ताक दिन चिरायू होवो...

# महापारेषणमध्ये ७२ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात

■ *टीम महापारेषण, मुंबई*

महापारेषणचे मुख्यालय असलेल्या प्रकाशगंगा येथे ७२ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. तसेच महापारेषणच्या सात परिमंडळ कार्यालयांमध्येही प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने विविध कार्यक्रम घेण्यात आले.

प्रकाशगंगा येथील मुख्यालयात महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांनी ध्वजारोहण केले. यावेळी महापारेषणचे संचालक (प्रकल्प) सर्वश्री रवींद्र चव्हाण, संचालक (वित्त) अशोक फळणीकर, कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) सुगत गमरे, कार्यकारी संचालक (पारेषण) श्रीकांत राजूरकर, मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) संजय कुमार, मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) अनिल कालेकर, महाव्यवस्थापक (मा. सं. मनुष्यबळ नियोजन) सुधीर वानखेडे, मुख्य अभियंता शशांक जेवळीकर, कंपनी सचिव कु. विनीता श्रीवाणी, शिष्टाचार अधिकारी सतीश जाधव यांच्यासह वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





**प्रकाशगंगा इमारत, मुंबई :** महापारेषणचे मुख्यालय असलेल्या प्रकाशगंगा येथे ध्वजारोहणप्रसंगी मानवंदना देताना महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे.

## महापारेषण कंपनीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती माहे डिसेंबर २०२०-जानेवारी २०२१

### नियुक्ती

| अ.क्र. | नाव | पद | पदस्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. प्रकाश श्रीराम कुरसंगे | अधीक्षक अभियंता | अउदा संवसु मंडळ, सोलापूर | ३१.१२.२०२० |

## प्रज्ञासूर्याला विनम्र अभिवादन!



**प्रकाशगंगा इमारत, मुंबई :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिनानिमित्त महापारेषणमध्ये सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

■ अधिकारी व कर्मचाऱ्यांची मोठी उपस्थिती ■

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिनी अभिवादन

■ *टीम महापारेषण, मुंबई*

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीत (महापारेषण) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिनानिमित्त सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

सुरूवातीला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस महापारेषणचे संचालक (वित्त) श्री. अशोक फळणीकर यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. ``भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेले विचार सर्वांनी आचरणात आणले तर खऱ्या अर्थाने त्यांना आदरांजली ठरेल.'', असे विचार मान्यवरांनी व्यक्त केले. यावेळी श्री. अशोक फळणीकर व श्री. सुगत गमरे यांनीही आपले मनोगत व्यक्त करून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली वाहिली.

याप्रसंगी कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे, महाव्यवस्थापक (मा.सं. मनुष्यबळ नियोजन), श्री. सुधीर वानखेडे, शिष्टाचार अधिकारी श्री. सतीश जाधव यांचेसह अन्य अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**मुंबई :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करताना महापारेषणचे संचालक (वित्त) श्री. अशोक फळणीकर.

## वंदन ज्ञानज्योतीला...



**मुंबई :** क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस अभिवादन करताना महापारेषणचे कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे.

■ महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांची मोठी उपस्थिती ■

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी

■ *टीम महापारेषण, मुंबई*

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीत (महापारेषण) क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची १९० वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या वतीने सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले.

सुरुवातीला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस महापारेषणचे कार्यकारी संचालक (मा. सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्रीमती संगीता पावशे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्रीमती रंजना खैरे, उपकार्यकारी अभियंता श्रीमती निशिगंधा बनकर, उपव्यवस्थापक (विवले) श्रीमती प्रेमा कुरकुटे, उपव्यवस्थापक (मा.सं.) श्रीमती भारती कांबळे यांचेसह विविध अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्यावर माहिती सांगितली. श्रीमती निशिगंधा बनकर व श्रीमती भारती कांबळे यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्याविषयी माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार श्रीमती भारती कांबळे यांनी केले.



**मुंबई :** क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त आयोजिलेल्या कार्यक्रमप्रसंगी कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे. शेजारी महिला अधिकारी व कर्मचारी वर्ग.

*From the Desk of ED, HR*

# मानव संसाधन विभागाला आधुनिकीकरणाची आस

मानव संसाधन विभागाने अनेक Automation चे प्रकल्प हाती घेतले आहेत. खरं तर या आधुनिक जीवनात Automation मुळे मानव संसाधन विभागाच्या कार्यप्रणालीमध्ये मोठा बदल होऊन विभागाची उत्पादकता वाढीस येऊ शकते.

दैनंदिन कार्यप्रणालीचा पध्दतशीर अभ्यास करून जर त्यावर संगणकीकृत प्रणाली निर्माण केली तर वेळेची बचत होऊन विभागाला मानव संसाधन विकासाच्या (Human Resources Development) कामावर अधिक लक्ष देण्यास फार मोठी मदत होईल.

त्याच अनुषंगाने मानव संसाधन विभाग आता आधुनिकीकरणावर लक्ष केंद्रित करत आहे. अनेक आधुनिकीकरणाचे अभिनव प्रकल्प निवडण्यात आले आहेत, त्यांची वेळापत्रकानुसार कार्यवाही ठरविण्यात आली आहे. त्यासाठी प्रशासनाला व्यवस्थापनाकडून खूप चांगले प्रोत्साहन आणि सहकार्य मिळत आहे.



आधुनिकीकरणाच्या या प्रकल्पामध्ये E-Service Book, दंडात्मक कार्यवाही विभागाची NOC संगणकीय प्रणालीतून कोणत्याही कार्यालयातून प्राप्त होणे, Online Performance Appraisal System, Improvement in online Request Transfer System, Online Disbursement Of Higher Grade Benefits, संगणकीय प्रणालीव्दारे प्राप्त होणारे A to L Report Format, Online Leave Management, HR Services on Mobile Through MSETCL HR App आदी करणे सोपे व सुलभ झाले आहे.

प्रशासनही हळूहळू सर्व आधुनिकीकरणाचे प्रकल्प कार्यान्वित करणार आहे. त्यातील E-Service Book या प्रकल्पाचे मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे व मा. संचालक (संचलन) श्री. संजय ताकसांडे यांच्या उपस्थितीत या आधुनिक प्रणालीचे उदघाटन झाले. तसेच संपूर्ण Hard Copy Service Book चा Data या आधुनिक संगणकीय प्रणालीमध्ये एका महिन्याच्या कालावधीत पूर्ण करण्यास प्रशासन यशस्वी झाले. संपूर्ण महाराष्ट्रातील सुमारे दहा हजार कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांचा हा विस्तृत Data, E-Service Book च्या माध्यमातून संकलित केल्याबद्दल प्रशासनातर्फे सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मी मनापासून कौतुक करतो.

या अभिनव प्रकल्पामुळे हा अतिमहत्त्वाचा Employee Record आपल्याला अविरत ठेवता येणार आहे. त्याचे Real Time Update राखण्याची तरतूद प्रणालीमध्ये करण्यात आली आहे. हा Data मानव संसाधनाच्या इतर कार्यप्रणालीशी सुयोग्य पध्दतीने Interface करून त्याचा फार चांगला उपयोग प्रशासनाला करता येईल. तसेच Hard Copy गहाळ होणे, खराब होणे यावर एक चांगला पर्याय प्रशासनास उपलब्ध झाला आहे.

प्रशासन या अभिनव प्रकल्पाची अनेकस्तरावर माहिती करून देत आहे. जेणेकरून इतर सरकारी उपक्रमसुध्दा प्रेरित होऊन हा प्रकल्प हाती घेतील.

दंडात्मक कार्यवाही विभागाच्या NOC साठी बऱ्याच वेळा मुंबईच्या सांघिक कार्यालयाला हेलपाटे मारावे लागत होते. अनेक कारणांसाठी ही NOC महत्त्वाची असते. आता मात्र, नजीकच्या काळामध्ये ही NOC सहजपणे मिळणार आहे. निवृत्तीच्या वेळी देयके अदा करण्यासाठी, पदोन्नतीवेळी किंवा HGB देण्यासाठी तसेच इतर अन्य कारणास्तव आता या प्रकल्पाअंतर्गत सर्व Data संकलित करून तो अद्ययावत ठेवण्यात येणार आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील कोणत्याही कार्यालयात ERP/ SAP प्रणालीतून ही NOC मिळणार आहे. ही सुविधा नववित्तीय वर्षापासून म्हणजेच १ एप्रिल २०२१ पासून प्रशासन देणार आहे. या प्रकल्पामधील कार्यरत सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मी मनापासून अभिनंदन करतो.

अशा पध्दतीने Online Performance Appraisal System ची उपलब्धता १ एप्रिल २०२१ पासून करण्यात येणार आहे. यासंदर्भात मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांनी मौलिक मार्गदर्शन करून हा प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी प्रशासनास मंजुरी दिली आहे.

Online Request Transfer या प्रणालीमध्ये सुध्दा अनेक कर्मचारी गट व युनियन प्रतिनिधींकडून काही सूचना आल्या आहेत. त्या सूचनांचा अभ्यास करून प्रशासनाने प्रणालीमध्ये काही सुसंगत बदल करण्याचे प्रस्तावित केले आहेत. हे प्रस्तावित बदल मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या अवलोकनार्थ ठेऊन त्यांनी दिलेल्या निर्देशानुसार व मंजुरीनुसार प्रशासन हा प्रकल्प कार्यान्वित करेल.

असे अनेक अभिनव प्रकल्प कार्यान्वित करून मानव संसाधन विभाग मानव संसाधन विकासाच्या कामावर अधिक लक्ष केंद्रित करणार आहे.

**शुभेच्छांसह..!**

**– सुगत गमरे**

**कार्यकारी संचालक (मानव संसाधन) (प्रभारी)**


संपादक : डॉ. मिलिंद आवताडे, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)
E-mail : prohr@mahatransco.in
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं.सी.-१९, ई-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

Printed & Published by **PRO** for **Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,**
Printed at **Hema Arts:** 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka, W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai-400 068. Ph : 2896 8221
& Published at Prakashganga, Bandra-Kurla Complex, Mumbai-400 051.


The Company accepts no responsibility for the matter published in the journal.